# बनावट सोने विकणारा चोरटा पोलीस स्टेशन हिंगणघाट येथील गुन्हे प्रकटीकरण पथकाचे जाळयात

फिर्यादी श्री प्रशांत मोहनराव उमाटे, रा. ज्ञानेश्वर नगर, म्हसाळा हे ऑटो चालक असून वर्धा ते पुलगाव असे प्रवासी वाहतुक करीत असतात. दिनांक २३-०३-२०२२ रोजी फिर्यादीची आरोपी क्रमांक १) धर्मराज उर्फ रामु गंगाप्पा भोसले आणी एका विधीसंघर्शीत बालक यांचेशी ओळख झाल्याने आरोपीने फिर्यादीचा मोबाईल क्रमांक प्राप्त करून फिर्यादीस वारंवार फोन करून त्यांचेकडे सोने विक्री करीता असुन कमी किमतीमध्ये विकायचे आहे. असे प्रलोभन दिल्याने दिनांक २६-०३-२०२२ रोजी पोलीस स्टेशन हिंगणघाट हद्दीतील दाभा शिवारातील रेल्वे पटरीजवळ येवुन आरोपीतांनी फिर्यादी यांना सोन्यासारख्या दिसणाऱ्या पिवळया धातुच्या ६ नग पटटया देवुन असली सोने आहे असे भासवुन फिर्यादी कडुन २०,०००/- रूपये घेतले. नंतर फिर्यादी यांनी सदर सोन्याची सोनाराकडुन पडताळणी केली असता सदरच्या पट्ट्या सोन्याच्या नसुन नकली असल्याचे समजल्याने फिर्यादी यांना त्यांची फसवणुक झाल्याचे लक्षात आल्याने फिर्यादी यांनी दिनांक २७-०३-२०२२ रोजी पोलीस स्टेशन हिंगणघाट येथे दिलेल्या रिपोर्टवर अप. क्रमांक ३७०/२०२२ कलम ४२०, ३४ भादविचा गुन्हा नोंद करण्यात आला.

सदर गुन्ह्याची तात्काळ दखल घेवुन अनोळखी आरोपीतांचा शोध घेण्याबाबत सुचना देण्यात आल्या. सदर अनोळखी आरोपीतांचा शोध सुरू असताना संशयीत आरोपी हे हिंगणघाट हद्दीत फिरत असल्याची गोपनिय माहिती प्राप्त झाल्याने पोउपनि. सोमनाथ टापरे यांचे सह पथकाने दाभा ते कवडघाट शिवारातील जंगलात सापळा रचुन आणी पाठलाग करून आरोपी नामे १) धर्मराज उर्फ रामु गंगाप्पा भोसले, वय ४० वर्ष, रा. रिमडोह आणी एक विधीसंघर्शीत बालक यांना ताब्यात घेतले. त्यांचे ताब्यातुन ५ मोबाईल, एक धारदार लोखंडी पात्याचे गुप्तीसारखे हत्यार, दोन कटर, सोन्यासारख्या दिसणाऱ्या पिवळया धातुच्या २० पटटया आणी मिरची पावडर असा मुददेमाल जप्त केला. आरोपी नामे धर्मराज उर्फ रामु गंगाप्पा भोसले, वय ४० वर्ष, रा. रिमडोह याचा दिनांक ३०-०३-२०२२ पावेतो पोलीस रिमांड प्राप्त केला असता पोलीस कस्टडी रिमांड दरम्यान आरोपीने दिलेल्या कबुलीवरून सोन्यासारखे दिसनारे ४ नग दोन ग्रॅम वजनाचे तुकडे, फिर्यादीची फसवणुक करून घेतलेले नगदी २०,०००/- रूपये, धातु कापण्याचा एक लोखंडी लांब अडकीत्ता, १४ नग गोलाकार पिवळया धातुच्या आंगठया, पिवळया धातुच्या सोन्यासारख्या दिसणाऱ्या २२ नग पटटया असा एकुण ४३,४८०/- रू चा माल जप्त केला. तसेच आरोपीजवळ धारदार गुप्तीसारखे शस्त्र मिळुन आल्याने नमूद गुन्हयात भारतीय शस्त्र अधिनियम कलम ४, २५ प्रमाणे वाढ करण्यात आली आहे.

सदरची कार्यवाही मा. पोलीस अधीक्षक श्री. प्रशांत होळकर, मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. यशवंत सोळंके, मा. उपविभागीय पोलीस अधिकारी, हिंगणघाट श्री. दिनेश कदम यांचे मार्गदर्शनात पोलीस निरक्षक श्री. संपत चव्हाण यांचे निर्देशानुसार पोलीस उपनिरीक्षक सोमनाथ टापरे व गुन्हे प्रगटीकरण पथकातील पोलीस अंमलदार विवेक बनसोड, प्रशांत भाईमारे, विलास कोकोडे, पंकज घोडे, प्रशांत वाटखेडे, उमेश बेले, राहुल साठे, संग्राम मुंडे, रमेश सोनेकर, विशाल ढेकले, नितीन ताराचंदी, आकाश कांबळे आणी गृहरक्षक प्रशांत वाघ व गोलु काटकर यांनी केली.